डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील सुधारीत वेतनसंरचनेतील वेतन घेणाऱ्या कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि.०१ जानेवारी,२०२२ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.....

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

वाचा :१)वित्त विभाग शासन निर्णय क्र.मभवा-१३२२/प्र.क्र.८/सेवा-९, दि. १७ ऑगस्ट,२०२२.
२)वित्त विभाग शासन निर्णय क्र. निमवा-२०२२/प्र.क्र.४७/ सेवा ४, दि. १७ ऑगस्ट,२०२२.

## आदेश

दिनांक २९/०८/२०२२.

जा.क्र./अप्रवि/ मभवा -निमवा/२०२२-२३/ १२७१

शासनाने उपरोक्त शासन निर्णय दि. १७ ऑगस्ट,२०२२ अन्वये ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचनेतील वेतन घेणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या मूळ वेतनावरील व निवृत्तिवेतन धारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकांनां मूळ निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतनाच्या एकूण रकमेवर अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर दिनांक १ जानेवारी,२०२२ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ३१ टक्के वरुन ३४ टक्के (म्हणजेच सद्याच्या महागाई भत्यात ०३ टक्के वाढ) सुधारीत करण्यात आला आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील अधिकारी/ कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून उपरोक्त महागाई भत्त्याची वाढ रोखीने देण्यात यावी.

सदरहू महागाई भत्त्याची वाढ माहे ऑगस्ट २०२२ च्या नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात अदा करावी. दिनांक १ जानेवरी,२०२२ पासूनच्या महागाई भत्ता थकबाकी ची देयके माहे ऑगस्ट,२०२२ देय सप्टेंबर,२०२२ चे नियमित मासिक नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयक पारित्त केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०२२-२३ चे मंजूर वेतन व निवृत्तीवेतन लेखाशीर्षाखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनातंर्गत २०२२-२३ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी प्रस्तुत महागाई भत्त्यात वाढ विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

मा.कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीने........

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

पुढील पानावर........

R.RAUT Bud

प्रति: १) नियंत्रक अधिकारी (सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख (सर्व)

..................................................................................................................................

२) प्राचार्य, ..................................................................................................................

३) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

R.RAUT Bud